प्रकरण पाचवे :-

## * दलित कामगारांचा व यंत्रमागधारकांचा राजकीय सहभाग *

## -: प्रकरण पाचवे :-

### दलित कामगारांचा राजकीय सहभाग :-

दलित कामगारांचा राजकीय सहभाग वेगवेगळ्या स्वरुपाचा असलेला दिसतो. कामगार संघटनेमध्ये इतर कामगारांच्या बरोबरीने ते चळवळीत उतरतात. परंतु राजकीय पक्षनिष्ठेच्या बाबतीत वेगळेच चित्र दिसून येते. सर्व यंत्रमाग कामगारांच्या बरोबरीने ते संप व मोर्चे यामध्ये सहभागी - होतांना दिसतात. कारण यंत्रमागावरील कामगार म्हणून सर्व कामगारांचे समान आर्थिक हितसंबंध आहेत. राजकीय पक्षनिष्ठा प्रामुख्याने मतदानातून व्यक्त होते. यंत्रमागावरील दलित कामगारांनी निवडणुकीत आपण कोणत्या पक्षाला पाठिंबा देतो हे स्पष्ट केले आहे ते पुढील प्रमाणे, -

-/ तक्ता क्रमांक - ११ /-

-x दलित यंत्रमाग कामगारांची राजकीय पक्षनिष्ठा x-

| राजकीय पक्ष | दलित कामगारांचे प्रमाण |
|---|---|
| इंदिरा काँग्रेस .. | ७५% |
| मार्क्सवादी कम्युनिस्ट. | १७% |
| जनता दल .. | ६% |
| शिवसेना .. | ०% |
| भारतीय रिपब्लिकन पक्ष | १% |
| भारतीय जनता पक्ष .. | ०% |
| अपक्ष .. | १% |

दलित कामगार वेगवेगळया राजकीय पक्षांना किती प्रमाणात पाठिंबा देतात हे तक्ता क्र. ११ वरून समजून येते. इंदिरा काँग्रेसला ते सर्वाधिक पाठिंबा देतात. म्हणजेच दलित कामगार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला फारसा पाठिंबा देत नाहीत. याचे कारण काँग्रेस पक्ष हा इचलकरंजीतील प्रभावी पक्षआहे. दलितांचे नेते काँग्रेस पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते आहेत. त्यामुळे दलित कामगारही काँग्रेस पक्षाला आपला - पाठिंबा देतात. १७% दलित कामगार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला मतदान करतात. म्हणजेच ते कामगार संघटनेचे क्रियाशील सभासद असलेले दिसून येतात. जनता दलाला ६% पाठिंबा दलित कामगारांनी दिला आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षाला १% व अपक्ष उमेदवारांना १% पाठिंबा असतो. तर शिवसेना व भा.ज.प. सारख्या राजकीय पक्षांना दलित यंत्रमाग कामगार कोणत्याही प्रकारचा पाठिंबा व्यक्त करीत नाही.

दलित कामगारांना इतर कामगारांपेक्षा वेगळ्या सवलती दलित व दलितेतर यंत्रमागधारकांकडून दिल्या जात नाहीत. तसेच शासनाकडूनही यंत्रमाग व्यवसायातील दलित कामगारांसाठी विशेष तरतुदी किंवा कायदे केले गेलेले नाहीत. दलित कामगारांसाठी "दलित कामगार संघटना" अस्तित्वात नाही. तसेच दलित कामगारांचा ठसा फारसा कामगार - संघटनेवर उठलेला दिसत नाही.

इचलकरंजीमध्ये यंत्रमाग व्यवसायातच कामगारांची एकच संघटना असून ती "लाल बावटा जनरल कामगार युनियन" या नावाने कार्य करीत आहे. तिच्या रचनेसंदर्भात व कार्यासंदर्भात कामगार नेते के.एल्. मलाबादे यांनी उपयुक्त माहिती दिली आहे.[१]

"या संघटनेचे कार्यक्षेत्र हातकणंगले तालुक्यापुरते मर्यादित आहे. तसेच ही संघटना मध्यवर्ती कामगार संघटनेची [सिटू/सी.आय.टी.यु.] संघटनेशी संलग्न आहे. या संघटनेचे सभासद होण्यासाठी कामगाराने खालील अटी पूर्ण केल्या पाहीजेत.

१] कामगार ज्या व्यवसायात काम करतो त्यामध्ये तो तज्ञ असला पाहीजे.

२] त्याचे वय १८ वर्षे पूर्ण असले पाहीजे.

३] कामगाराने संघटनेची सभासद वर्गणी दिली पाहीजे.

४] कामगाराने संघटनेची प्रवेश फी भरली पाहीजे.

५] मासिक वर्गणी ६ महिने कामगाराने भरली नाहीतर त्याचे सभासदत्व रद्द होते.

कामगार संघटनेची रचना :-

ट्रेड युनियन ॲक्ट १९२६ नुसार संघटनेची निर्मिती होते. संघटनेला आपली घटना तयार करावी लागते. १० कामगारांना एकत्र येऊन संघटना स्थापन करता येते. कामगार एकत्र आल्यानंतर त्यांना आपल्या संघटनेची उद्दिष्टे स्पष्ट करावी लागतात. त्याचप्रमाणे कोणत्या व्यवसायात ही संघटना कार्य करणार आहे हे निश्चित करुन त्यानंतर अर्ज करुन संस्था रजिस्टर करावी लागते. एका पेक्षा जास्त जॉईन्ट सेक्रेटरी, खजिनदार व कार्यकारिणी ठरवावी लागते. ही सर्व रचना घटनेमध्ये नमूद करावी लागते. ऑनररी मेंबर किती असावेत हे ठरवावे लागते.

१ एप्रील पासून ३१ मार्च पर्यंत संघटनेचे वर्ष धरले जाते. वार्षिक अहवाल तयार करावे लागतात. ५०० मेंबर असतील तर कार्यकारिणी ऑडिट करते. त्यापेक्षा जास्त मेंबर असतील तर चार्टर्ड अकौंटंट कडून ऑडीट करून घ्यावे लागते.

संघटनेचा निधी देणग्या आणि वर्गणी यातून गोळा केला जातो. यातून होणारा खर्च म्हणजे ऑफिसासाठी होणारा खर्च, कायदेशीर कारवाईसाठी होणारा खर्च, सभासदांसाठी सुविधा करणे, सभा, मेळावे घेणे, शिबीरे संघटित करणे इ.साठी होणारा खर्च.

कामगारांसाठी ही संघटना निर्माण झालेल्या असल्यामुळे कामगारांचे हितसंबंध जोपासण्याचे कार्य या संघटनेकडून केले जाते. संघटनेचे महत्त्व फार आहे. कारण एकत्र आल्याशिवाय कामगारांना हक्क मिळू शकत नाहीत. एकटा कामगार कांहीही करू शकत नाही. म्हणून कामगारांच्या संघटना निर्माण होतात. कामगार संघटित झाला तरच त्याचे हितसंबंध साध्य होतात.

या कामगार संघटनेमध्ये दलित कामगारही आहेत. परंतु दलित कामगारांना वेगळे स्थान नाही. स्त्रियांना वेगळे स्थान दिले आहे. दलित कामगारांना संघटनेमध्ये नेतृत्वासाठी राखीव जागा नाहीत. कामगारांनी निवडून दिले तर दलित कामगार नेतृत्व करू शकतो."

इचलकरंजीतील कामगारांच्या परिस्थितीबद्दल मलाबादे पुढे म्हणतात, असंघटित यंत्रमाग कामगारांसाठी शासनाने कायदे केले पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. कामगारांना किमान वेतनानुसार पगार

मिळत नाही. प्रॉव्हीडंट फंडाचा कायदा कमीत कमी १० कामगार असले तरी लागू होतो. परंतु इचलकरंजीमध्ये कमी कामगार दाखविले जातात. त्यामुळे ग्रॅच्युईटी नाही, बोनस नाही, पेन्शन नाही, पगारही आठवड्यावर होतात. त्याचीही हमी नसते. वीज नसेल, सूत नसेल तर माग बंद ठेवले जातात. कामगारांना कोणतेही संरक्षण नाही. सोई नाहीत. आवाजाच्या प्रदुषणामुळे कान बधिर होतात. धुळीच्या व सूताच्या कणांमुळे तसेच ब्लीचिंग, कॉस्टींग केलेले सूत वापरले तर त्याला रोग होतात. उदा. टी.बी., खोकला, शारीरिक अशक्तता इ.

मागावर आडवे धागे विणण्यासाठी धोटा इकडून तिकडे फिरत असतो. हा धोटा केंव्हाही उडू शकतो. त्यामुळे कामगाराला गंभीर दुखापत होऊ शकते. यंत्रमागाला सेफ्टी गार्ड बसवलेला नसतो. तसेच कामगारांसाठी सॅनिटरी वगैरे सोयी नाहीत. इचलकरंजीमध्ये ३ ते ४ शॉप इन्स्पेक्टर्स आहेत, व एकूण संख्या ३० हजार आहेत. त्यामुळे सरकारचेही फारसे नियंत्रण नसते. कामगारांसाठी घराची कोणतीही योजना नसल्यामुळे ते झोपडपट्टीमध्ये बकाल वस्तीत राहतात. कामगार संघटनेच्या पुढाकाराने ७ एकर जागा घेऊन २०० ते २५० घरे तयार केली. त्याचप्रमाणे जनप्रबोधिनी संस्थेची स्थापना केली, तसेच लायब्ररी चालू केली.

किमान वेतन देण्याची यंत्रमागधारकांची इच्छा नाही. कामगार ४ मागावर काम करतात. तरीही त्यांना किमान वेतनाचा लाभ दिला जात नाही. छोटे मालक देऊ शकत नाहीत असे कारण पुढे करून मोठ्या यंत्रमागधारकांनी देण्याचे टाळले आहे. शासनाने कोणतेही कडक धोरण

या बाबतीत स्विकारलेले दिसत नाही.

इचलकरंजीतील असंघटित कामगारांचा दृष्टीकोन पाहीला तर असे दिसते की, इचलकरंजीमध्ये विषमता आणि शोषण जबरदस्त असले तरी त्याविरुध्द कामगारांची एकी होऊ शकत नाही. कारण आपला शत्रू कोण हे निश्चित करणे त्यांना अवघड झाले आहे. तसे पाहिले तर कामगार व दोन माग असलेला यंत्रमागधारक यांच्या परिस्थितीत फारसा फरक नाही. तरीहीते कामगारांमध्ये एक येत नाहीत. त्यामुळे कामगारांना निश्चित दिशा मिळू शकत नाही. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असलेले राजकारण इचलकरंजीतील दलित कामगारांमध्ये उभे राहू शकत नाही.

## दलित यंत्रमागधारकांचा राजकीय सहभाग :-

दलितांचा जसजसा आर्थिक विकास होत गेला तसतसे ते राजकारणातही प्रवेश करु लागले. इचलकरंजीच्या दलित यंत्रमागधारकांच्या बाबतीतही हेच घडलेले दिसून येते. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. तेच यंत्रमागधारक राजकारणात उतरलेले आहेत, असे दिसते.

इचलकरंजीतील यंत्रमागधारकांची संस्था म्हणजे, "इचलकरंजी पॉवरलूम विव्हर्स को-ऑप. असोसिएशन". या संस्थेमध्ये इचलकरंजीतील सर्व यंत्रमागधारक एकत्र आलेले दिसतात. दलित यंत्रमागधारकही या संस्थेचे सभासद आहेत. ही संस्था प्रामुख्याने इंदिरा काँग्रेस पक्षाच्या प्रभावाखाली आहे.

सर्व यंत्रमागधारकांचा समावेश या संस्थेत होत असला तरी मोठ्या यंत्रमाग-धारकांचे वर्चस्व असलेले दिसून येते.

इचलकरंजी शहरात "दलित मुक्ति सेना"व "दलित पँथर" या दलितांच्या संघटना अस्तित्वात आहेत. परंतु दलित यंत्रमागधारक या संघटनेत कार्य करतांना दिसत नाही. दलित यंत्रमागधारक निवडणुकीमध्ये जास्त प्रमाणात इंदिरा काँग्रेस पक्षालाच मतदान करतांना दिसून येतात.

डॉ.आंबेडकरांचे मत असे होते की, दलितांची अस्मिता स्वतंत्र असावी, व ती जपण्याचा प्रयत्न स्वतंत्र राजकीय पक्षाकडून केला जावा. त्यादृष्टीने आंबेडकरांनी "भारतीय रिपब्लीकन पक्षाची" स्थापनाही केलेली दिसून येते. परंतु दलितांमधील आपापसातील मतभेदामुळे त्या पक्षाचे अनेक गट उदयास आले. परंतु या गटांनाही दलित फारसा पाठिंबा देतांना दिसत नाहीत. त्यामुळे दलितांचा स्वतंत्र राजकीय पक्ष असला पाहिजे, ही अपेक्षा पूर्ण होत नाही. या उलट बहुसंख्य दलित इंदिरा काँग्रेस या राजकीय पक्षालाच पाठिंबा देतांना दिसतात. दलित यंत्रमागधारकांसाठी स्थापन झालेली "वसंतराव नाईक मागासवर्गीय यंत्रमाग कापड उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, इचलकरंजी" ही देखील इंदिरा काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत असून काँग्रेस कमिटीमध्येच स्थापन झालेली दिसून येते. इचलकरंजीमध्ये इतर जातींनी आपापल्या संस्था स्थापन केल्या होत्या. मागासवर्गीयांसाठी ८८,५०० रुपये फंड शिल्लक होता. त्यातून ही संस्था स्थापन झाली. असे या संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत कोरवी यांनी सांगितले.[२]

-/ तक्ता क्र. १२ /-

दलित यंत्रमागधारकांची राजकीय पक्षनिष्ठा

| राजकीय पक्षाचे नांव | | यंत्रमागधारकांचे प्रमाण |
|---|---|---|
| इंदिरा कॉंग्रेस | .. | ८०% |
| मार्क्सवादी कम्युनिस्ट | .. | १२% |
| जनता दल | .. | ५% |
| शिवसेना | .. | ०% |
| भारतीय रिपब्लीकन पक्ष | .. | १% |
| भारतीय जनता पक्ष | .. | ०% |
| अपक्ष | .. | २% |

दलित यंत्रमागधारकांची राजकीय पक्षनिष्ठा दाखविणा-या तक्ता क्र. १२ वरून असे दिसते की, दलितांचा जास्तीत जास्त पाठिंबा इंदिरा कॉंग्रेस पक्षाला असून तो ८०% इतका आहे. कारण येथील दलितांचे राजकीय नेते इंदिरा कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते असलेले दिसून येतात. इंदिरा कॉंग्रेसमधूनच त्यांचा राजकीय विकास झाला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला दलित यंत्रमागधारकांचा १२% इतका पाठिंबा आहे. कारण दलित यंत्रमाग धारक पूर्वी दलित कामगार होते. त्यावेळी ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. त्यामुळे त्यांची पूर्वीचीच राजकीय पक्षनिष्ठा आजही असलेली दिसते. दलित यंत्रमागधारक जनता दलाला ५% तर भारतीय रिपब्लीकन पक्षाला १% पाठिंबा देतात. त्याचप्रमाणे शिवसेना व भारतीय जनता पक्ष या राजकीय पक्षांना दलितांनी फारसा पाठिंबा दिलेला दिसत नाही.

कारण हे पक्ष मूलभूतवादी व जातीयवादी असल्यामुळे मागासवर्गीय त्यांना पाठिंबा देत नाहीत. याउलट त्यांना कॉंग्रेस पक्ष जवळचा वाटतो.

दलितांच्या राजकीय विकासाची माहिती आमदार जयवंतराव आवळे यांच्या मुलाखतीतून मिळते.[3]

"१९६२ साली कॉलेजचा विद्यार्थी असल्यापासूनच राजकारणाची मला आवड आहे. २५ व्या वर्षी नगरपालिका शिक्षण मंडळाचा सदस्य झालो. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कपडे देण्याची सुरुवात केली. सलग ६ वर्षे नगरपालिका शिक्षण मंडळाचा अध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९७८ मध्ये झोपडपट्टी संघटना उभारली. त्या संघटनेचे १०,००० सभासद होते. इचलकरंजीतील सर्व झोपडपट्टयांचे रजिस्ट्रेशन करुन त्यांना जागा मिळवून दिल्या. तसेच पाणी, लाईट, संडास इ.सोयी उपलब्ध करुन दिल्या.

त्याआधी १९७७ मध्ये इचलकरंजीत आय काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्या काळामध्ये इचलकरंजीतील इतर राजकीय नेते स्वर्णसिंग कॉंग्रेसकडे होते. अशा परिस्थितीत आय कॉंग्रेसची स्थापना केली. त्यानंतर १९८० मध्ये इचलकरंजी शहर कॉंग्रेसचा अध्यक्ष असतांना माझ्याकडून अध्यक्षपद काढून घेण्यात आले. तरीही प्रदेशाध्यक्ष व पक्षश्रेष्ठींपर्यंत जाऊन अध्यक्षपद परत मिळविले. जनरल मतदार संघातून तिकीट मिळाले नाही म्हणून वडगांवच्या राखीव मतदार संघातून १९८० मध्ये मी विधानसभेवर निवडून आलो.

विधानसभेमध्ये मागासवर्गीयांसाठी मी काम केले आहे. आर्थिक दुर्बलता असल्यामुळे मागासवर्गीयांचा विकास जलद गतीने होऊ शकत नाही. मागासवर्गीयांसाठी तीन ते चार लाख रुपये आमदार फंडातून खर्च केले आहेत.

त्यातूनच प्रामुख्याने विविध सहकारी संस्था व समाज मंदीरांची उभारणी करण्यात आली.

१९८४ च्या निवडणुकीमध्येही मी निवडून आलो. "ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचा" १९८३ व १९८८ साली अध्यक्ष निवडला गेलो. माणगांवला सहकारी सोसायटी स्थापन करण्याचा प्रयत्न केला. परंतु कार्यकर्त्यांनी खीळ घातल्यामुळे तो यशस्वी झाला नाही. आंध्र प्रदेशमधील सहकारी संस्थांची परिस्थिती चांगली आहे. तशा संस्था महाराष्ट्रात असाव्यात व सहकारी संस्थांना सरकारने अर्थसहाय्य द्यावे यासाठी विधानसभेत भाषण दिले.

यंत्रमाग व्यवसायाविषयी बोलतांना ते म्हणतात, आर्थिक परिस्थिती सुधारल्याशिवाय दलित यंत्रमागधारकांचा विकास होऊ शकणार नाही. आज यंत्रमाग उद्योगात अस्थिरता आहे. कांही मूठभर लोकांच्या हातात. हा व्यवसाय आहे. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती.

मोठ्या कापड गिरण्यांमध्ये कापूस बाहेरून आणला जातो, व त्याचे कापडच तयार होऊन बाहेर पडते. त्यामुळे मोठ्या कापड गिरण्यांना हा व्यवसाय परवडतो. पण इथे अनेक दलाल असल्यामुळे सर्व फायदा दलालच घेतात. तेजी व मंदी व्यापा-यांवर अवलंबून असते. अशी परिस्थिती राहू नये म्हणून यंत्रमाग महामंडळ स्थापन केलेले होते. पण ते यशस्वी झाले नाही."

वरील मुलाखतीतून दलितांच्या राजकीय नेत्यांनी राजकारणात स्थान मिळविण्यासाठी इंदिरा कॉंग्रेस पक्षाचा आधार घेतलेला दिसून येतो.

सुरुवातीला कॉंग्रेसमध्ये असलेले व सध्या अपक्ष म्हणून निवडून आलेले इचलकरंजीतील नगरसेवक महादेव कांबळे हेसुध्दा स्थानिक राजकारणात महत्वाची भूमिका बजावतात. तसेच ते यंत्रमागधारकही असलेले दिसून येतात. त्यांनी १९६८ साली यंत्रमाग घातले. १९७४ ला अपक्ष म्हणून निवडून आले. त्यानंतर १९८४ मध्येही अपक्ष म्हणून निवडले गेले.[४] त्यानंतर त्यांनी समाज-मंदीर बांधण्याचे काम केले.

मागासवर्गीयांच्या पोटजातीमध्येही राजकारण असल्याचे दिसून आले. या राजकारणामुळे सर्व जातींचा समान विकास होऊ शकत नाही. त्यादृष्टीने वैचारिक विकासाचा अभाव व लोकांचा कमकुवतपणा ही कारणे महत्वाची ठरतात. मागासवर्गीयांसाठी अनेक योजना आहेत. पण त्यांचा फायदा घेतला जात नाही. दलित उद्योजक कर्ज काढून यंत्रमाग घेतात. त्या कर्जाचे व्याज त्यांना भरावे लागते. त्यामुळे या उद्योगात त्यांचा टिकाव लागू शकत नाही, असे कांबळे यांचे मत आहे. सतत १० वर्षे नगरसेवक म्हणून राहून दलितांसाठी सोईसुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. मागासवर्गीयांच्या घरबांधणीसाठी "सिध्देश्वर हौसिंग सोसायटी" या संस्थेची स्थापना केली आहे. तसेच पॉवरलूम असोसिएशनचे ते सदस्य आहेत. त्यांच्या मते हा व्यवसाय पूर्णपणे मारवाडी व्यापाऱ्यांच्या ताब्यात असून आपल्या लोकांमध्ये तेवढी व्यापारी वृत्ती नाही.

दलितांमधील छोटे यंत्रमागधारक किंवा खर्चीवाले यंत्रमागधारक राजकीय प्रक्रियेत भाग घेण्यास फारसे उत्सुक नाहीत. कारण आर्थिक स्थिरता अजूनही त्यांना लाभलेली नाही. छोट्या यंत्रमागधारकांचे प्रमाण ७५% असलेले दिसून येते. राजकारणाबद्दल हे लोक उदासीन आहेत.

स्थानिक राजकारणात अनेक दलित नेते आहेत. ते स्थानिक सहकारी संस्थांमध्ये पदाधिकारी आहेत. आपल्याराजकीय प्रभावाचा उपयोग करून आपल्या जातीची एक गठ्ठा मते आपल्या राजकीय पक्षाला मिळावीत असा त्यांचा प्रयत्न असतो. त्यासाठी ते अनेक छोटया छोटया सहकारी संस्था स्थापन करतात. इचलकरंजीतील दलितांमध्ये प्रत्येक जातीची वेगळी संस्था आहे. ती संस्था त्या विशिष्ट जातीचा विकास व्हावा असा प्रयत्न करते. कांही वेळा अशा संस्था सुव्यवस्थित चालण्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज पसरतात.

दलित यंत्रमागधारक इतर यंत्रमागधारकांच्या बरोबरीने मालक संघटनेच्या चळवळीमध्ये भाग घेतात. यंत्रमागधारकांच्या धोरणास दलित उद्योजकही पाठिंबा देतात. उदा. सरकारने ६ जून १९८५ रोजी नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहिर केले. त्या धोरणास सर्वच यंत्रमागधारकांनी विरोध केला. त्यामध्ये दलित यंत्रमागधारकांचाही समावेश होता.[5] समान हितसंबंध असल्यामुळे सर्वजण एकत्र आलेले दिसतात. त्यामुळे दलित यंत्रमागधारकांचे इतर जातीच्या यंत्रमागधारकांशी सलोख्याचे व सहकार्याचे संबंध आहेत.

दलित यंत्रमागधारकांचे इतर दलित यंत्रमागधारकांशी असलेले संबंध सहकार्याचे आहेत. परस्परांना ते आर्थिक बाबींसंबंधी सहकार्य करतात. स्वतःचा आर्थिक विकास करत असतांना इतरांच्या आर्थिक विकासाला ते हातभार लावतात.

राजकीयदृष्टया दलितांमध्ये विविधता असली तरी यंत्रमागधारकांच्या समस्यांवर सर्वजण एकत्र येतात. दलित यंत्रमागधारक व दलितेतर यंत्रमागधारक

हे एकत्र येऊन किमान वेतन कायद्याला विरोध करतात. म्हणजे ते दलित कामगारांच्या हिताला विरोध करतात. तेंव्हा ते दलित कामगारांचा जातीच्या दृष्टीकोनातून विचार करीत नाहीत. येथे त्याचे राजकारण जातीच्या पलीकडे जातांना आपणांस दिसून येते.

-=[ o ]=-

## -* संदर्भ *-


| | | | |
|---|---|---|---|
| १. | कामगार नेते के.एल.मलाबादे | - | प्रत्यक्ष मुलाखत दि.७-९-१९८९ |
| २. | श्री. श्रीकांत कोरवी | - | प्रत्यक्ष मुलाखत - दि. २० ऑगष्ट १९८९. |
| ३. | आमदार जयवंतराव आवळे | - | प्रत्यक्ष मुलाखत - दि. २७ जुलै १९८९ |
| ४. | नगरसेवक महादेवराव कांबळे | - | प्रत्यक्ष मुलाखत - दि. १७ ऑगष्ट १९८९ |
| ५. | दि. बा. आजगांवकर | - | "वीजमाग उद्योगाचे भवितव्य" दै.सकाळ दि.१५ जून १९८८. |


-=[ o ]=-